मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २९१ | शनिवार, ०४ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

# ‘महाकनेक्ट’ संवादसेतू उपक्रमाव्दारे जागतिक मराठी मने जोडणार – राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

**मुंबई :** जगभरात असलेल्या मराठी माणसाने आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील महाकनेक्ट या संवादसेतू उपक्रमाव्दारे जागतिक स्तरावरील ही मराठी मने जोडण्यासाठी, सहसंबंध अधिक दृढ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला असल्याची माहिती राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जागतिक मराठी समुदायाशी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजशिष्टाचार सचिव डॉ राजेश गवांदे, राजशिष्टाचार विभागाचे अधिकारी तसेच अमेरिकेतील विविध मराठी मंडळाचे पदाधिकारी दूरदृश्य प्रणाली वरून उपस्थित होते.

**जगभरातील मराठी माणूस हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक राजदूत**

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, भारत आज जगातील मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत असून महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा आहे. विविध क्षेत्रात महाराष्ट्र वेगाने पुढे येत आहे. मराठी माणसाने आणि मराठी समुदायाने आपली मराठी संस्कृती व परंपरा आपल्या कर्तृत्वाने



आणि परिश्रमाने सातासमुद्रापार पोहोचवली आहे. राजशिष्टाचार विभागाच्या माध्यमातून परकीय थेट गुंतवणूक व प्रवासी भारतीय व्यवहार व संपर्क हे नवे विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. याअंतर्गत मराठी माणसाशी आणि समुदायाशी संवाद साधण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

मराठी माणूस संशोधन क्षेत्रातही आघाडीवर आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नेतृत्व करत आहे. नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात, उद्योग उभारणीत अग्रेसर आहे. जगभरातील मराठी माणूस हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक राजदूत

## •अमेरिकेतील मराठी समुदायांशी संवाद
## •जगभरातील मराठी माणूस हा महाराष्ट्राचा राजदूत

आहे. तो महाराष्ट्राचा भविष्यातील भागीदार आहे. अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळाने अमेरिकेत मराठी भाषा, साहित्य, संस्कृती,कला, परंपरा व सण-उत्सव जतन करण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी सांगितले.

**महाकनेक्ट हा संवाद सेतू उपक्रम जगभरातील मराठी समुदायाला एका डिजिटल व्यासपीठावर एकत्र आणणारा**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगभरातील भारतीय समुदायाशी आत्मीय नाते निर्माण केले आहे. याव्दारे त्यांनी भारतीय असण्याचा अभिमान अधिक दृढ केला आहे. याच विचारांतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महा-एनआरआय कनेक्ट- महाकनेक्ट या संवाद सेतू उपक्रमातून जगभरातील मराठी समुदायाला एका डिजिटल व्यासपीठावर एकत्र आणण्यात येणार आहे. हा संवादाचा मंच आहे.

विश्वासाचा सेतू आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून गुंतवणूक, उद्योग, व्यापार, पर्यटन, स्टार्टअप्स, धोरणात्मक चर्चांमध्ये सहभाग, ज्ञानाची देवाणघेवाण, महाराष्ट्र मंडळांचे जागतिक नेटवर्क, सांस्कृतिक कार्यक्रम, युवकांचा सहभाग आणि शासनाशी थेट संवाद अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील असे राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी सांगितले.




# रस्ता झाला, पण पाण्याचा निचरा नाही !
## मिरागावातील रस्त्यावर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी - बाळकृष्ण परब :** मिरा रोड पूर्व येथील मिरागाव रस्त्यावर झालेल्या पावसामुळे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे भूमिगत पर्जन्य जलवाहिन्यांचे काम आणि सिमेंट कॉँक्रीट (CC) रस्त्याचे काम पूर्ण झाले असतानाही पाण्याचा निचरा होत नसल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या कॉँक्रीटीकरणावेळी योग्य समतलीकरण (लेव्हलिंग) आणि उतार (स्लोप) देण्यात आलेला नाही. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात साचत आहे. परिणामी वाहनचालक, पादचारी तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः ए.पी. डायग्नोस्टिक सेंटर जवळील परिसर, तसेच ए.पी. महाविद्यालय आणी आंतरराष्ट्रीय शाळेच्या च्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तसेच मिरागाव परिसरातील अनेक ठिकाणी पाणी साचल्याचे चित्र दिसून येत आहे. पाण्याखाली रस्त्यावरील खड्डे व असमतल भाग दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ता तयार करण्यात आला; मात्र रस्त्याची उंची, उतार आणि पावसाच्या पाण्याचा निचरा यांचा पुरेसा विचार करण्यात आला नाही. परिणामी प्रत्येक पावसात रस्ता जलमय होत असून नागरिकांना त्याचा फटका बसत आहे.

नागरिकांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे या भागाची तातडीने तांत्रिक पाहणी करून रस्त्याच्या समतलीकरण्यातील त्रुटी दूर कराव्यात, पाणी साचण्याचे कायमस्वरूपी समाधान करावे आणि संबंधित ठेकेदाराच्या कामाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आगामी प्रत्येक पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




# भर पावसातही नागरिकांचा निर्धार कायम
## मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील टोल व रस्त्याच्या गुणवत्तेच्या प्रश्नासाठी खारपाडा टोलनाक्यावर लक्षवेधी आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना सुरू असलेली टोल वसुली आणि महामार्गाच्या अनेक ठिकाणची निकृष्ट व धोकादायक रस्त्याची गुणवत्ता या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी आज खारपाडा टोलनाक्यावर भर पावसात शांततापूर्ण लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

मुसळधार पाऊस सुरू असतानाही नागरिकांनी मोठ्या निर्धाराने या आंदोलनात सहभाग घेतला. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून, समस्त कोकणातील जागरूक नागरिकांचे आंदोलन आहे. सुरक्षित, दर्जेदार आणि पूर्णत्वास गेलेला महामार्ग मिळावा, तसेच तोपर्यंत टोल वसुली थांबवावी, ही या आंदोलनामागील प्रमुख मागणी आहे.या आंदोलनातून कोकणातील सर्व पक्षीय विद्यमान व माजी खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधींना नम्र विनंती करण्यात आली आहे की, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील टोल वसुलीचा प्रश्न आणि रस्त्याच्या गुणवत्तेचा प्रश्न




सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठामपणे मांडावा. हा विषय केवळ उपस्थित करून न थांबता, शासनाकडून ठोस निर्णय होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग हा कोकणवासीयांच्या दैनंदिन जीवनाशी, अर्थकारणाशी आणि सुरक्षित प्रवासाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे हा प्रश्न पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन जनहिताचा विषय म्हणून हाताळण्याची गरज आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

“रस्ता पूर्ण आणि दर्जेदार होईपर्यंत टोल वसुली अन्यायकारक आहे,” अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. या प्रश्नावर शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी आणि लोकप्रतिनिधींनी जनतेचा आवाज विधिमंडळात बुलंद करावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

भर पावसात सुरू झालेले हे लक्षवेधी आंदोलन म्हणजे केवळ निषेध नसून, कोकणातील लाखो प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि न्याय्य हक्कांसाठी दिलेली शांततापूर्ण पण ठाम हाक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचेपर्यंत हा पाठपुरावा सुरूच राहील, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या लक्षवेधी आंदोलनात ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील सर , नरेश पाटील , नंदकुमार जांभूळकर , निरंकार पाटील, कमलेश ठाकूर, अजय भोईर , वैभवी म्हात्रे, अरुण ओतकर व रस्ते अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण पाटील, तसेच यांच्यासह अनेक सुजाण नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला तसेच कोकणासह राज्याच्या विविध भागांतील अनेक नागरिकांनी , पत्रकार यांनी सोशल मीडिया व अन्य माध्यमांद्वारे ऑनलाइन सहभाग नोंदवत या आंदोलनाशी एकात्मता व्यक्त केली.

तसेच या लक्षवेधी आंदोलनासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याने घालून दिलेल्या अटी, नियम व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात आले. हे लक्षवेधी आंदोलन शांततापूर्ण व सुव्यवस्थित पद्धतीने पार पडले. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

या लक्षवेधी आंदोलनाच्या माध्यमातून जागरूक नागरिकांनी आपले कर्तव्य पार पाडले आहे. आता लोकशाही व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींनी आपली जबाबदारी ओळखून मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील टोल वसुली आणि रस्त्याच्या गुणवत्तेचा प्रश्न सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठामपणे मांडावा आणि तो मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करावा, अशी नागरिकांची नम्र पण ठाम अपेक्षा आहे.

# डॉक्टर दिनानिमित्त डॉक्टरांचा भव्य सत्कार, पनवेलमध्ये अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराइज आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे भव्य डॉक्टर सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. रायगड जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांचा एकत्रित गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी म्हाडा अध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील व प्रांतपाल रोटरी प्रांत 3131 नितीन धमाल, परभणी येथील धन्वंतरी सरस्वती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल पाटील, नगरसेविका डॉ. दर्शना भोईर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित होते.

या सोहळ्यात पनवेल व परिसरातील गेली १५ ते ३० वर्षे आरोग्यसेवा देणाऱ्या जनरल प्रॅक्टिशनर्स, औद्योगिक वैद्यकीय अधिकारी, विविध तज्ज्ञ सल्लागार डॉक्टर अशा सर्व क्षेत्रातील एकूण ४७ डॉक्टरांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या उपक्रमाचे नेतृत्व रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षा डॉ. जयश्री पाटील तसेच कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील व ट्रस्टी दादासाहेब श्री पराग बेडसे यांनी केले. या कार्यक्रमास रोटरीचे माजी प्रांतपाल रो. डॉ. गिरीश गुणे, रो. डॉ. दीपक पुरोहित, रो. डॉ. शैलेश पालेकर आणि रो. डॉ. अनिल परमार यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर आणि कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.




या सोहळ्यास वैद्यकीय क्षेत्रातील ज्येष्ठ डॉक्टर डॉ. सुहास हळदीपुरकर, डॉ. रमेश पटेल, डॉ. ययाती गांधी, डॉ. समिधा गांधी, डॉ. समीर सहस्रबुद्धे, डॉ. सुरेश मोरे, डॉ. प्रमोद गांधी, डॉ. विजय डोंगरे, डॉ. आशा डोंगरे, डॉ. डी. बी. पाटील, डॉ. शोभना पालेकर, डॉ. जनार्दन, डॉ. अरविंद कुलकर्णी, डॉ. शैलेश गांधी, डॉ. महेश मोहिते, अनेक मान्यवर डॉक्टर तसेच पॅरामेडिकल स्टाफ, नर्सिंग स्टाफ तसेच मान्यवर बांधकाम व्यावसायिक सतीश मोरे आणि डॉ. मानसी मोरे शेलके यांचीही उपस्थिती लाभली. रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, रोटरी क्लब ऑफ सनराईज पनवेल आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांची संयुक्त फ्युजन सभा देखील पार पडली. रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षा डॉ. जयश्री पाटील, सचिव ॲड. डॉ. हितेश राजपूत, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईजचे अध्यक्ष रो. इंजि.काशिराम पाटील, सचिव रुपेश यादव तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरचे अध्यक्ष भगीरथ गोस्वामी, सचिव रो. डॉ. दीपक खोत आणि सदस्य उपस्थित होते.

महापौर नितीन पाटील यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा नियोजीत अमृत



महोत्सवानिमित्त केलेला सत्कार व मानपत्र प्रतिनिधी म्हणून स्वीकारले. त्यांनी आपल्या भाषणात डॉक्टर समाजाचे आरोग्य रक्षण करणारे खरे शिल्पकार असून त्यांची सेवा अमूल्य असल्याचे सांगितले व अशा उपक्रमांमुळे समाजात डॉक्टरांविषयीचा आदर अधिक दृढ होतो, असे प्रतिपादन केले. आमदार विक्रांत पाटील यांनी सांगितले की, जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत प्रत्येक व्यक्तीला डॉक्टरांची गरज भासते. देवाच्या नंतर आपण डॉक्टरांनाच स्मरतो. कोणताही रुग्ण आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांपासून वंचित राहू नये, ही प्रत्येक डॉक्टरची सामाजिक जबाबदारी आहे."

अध्यक्षीय समारोपात बाळासाहेब पाटील यांनी डॉक्टरांच्या समाजसेवेचे कौतुक करून अशा गौरव सोहळ्यांमुळे सेवाभावी वैद्यकीय क्षेत्राला नवी प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.

कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था पनवेलचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "पनवेलमध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर डॉक्टरांचा सन्मान करण्याचा हा ऐतिहासिक उपक्रम आहे. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १ जुलै रोजी हा सन्मान सोहळा आयोजित करण्याचा आमचा मानस आहे."

पीडीजी रो. डॉ. गिरीश गुणे यांनी रोटरी आणि वैद्यकीय व्यवसाय यांच्यातील 'Service Above Self' या समान मूल्यावर प्रकाश टाकत, ग्रामीण भागात निस्वार्थपणे सेवा देणाऱ्या डॉक्टरांचाही अशाच प्रकारे सर्व रोटरी क्लबांनी सन्मान करावा, असे आवाहन केले.

हा आगळावेगळा डॉक्टर गौरव सोहळा उपस्थित मान्यवर, डॉक्टर, रोटेरियन्स आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या सोहळ्यानंतर अभिनेत्री निर्मिती सावंत आणि त्यांच्या टीमने सादर केलेल्या 'विहीणबाई जोरात' या विनोदी नाटकाचे सादरीकरण झाले.

## मेंडका येथे वै. श्री संत ह.भ.प. नारायण महाराज यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- प्रकाश गवारे** : वै. श्री संत ह.भ.प. नारायण महाराज यांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त मौजे मेंडका येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. श्री पंढरीनाथ महाराज पंढरपुरकर यांच्या आशीर्वादाने हा धार्मिक सोहळा दि. २ जुलै २०२६ (गुरुवार) ते ९ जुलै २०२६ (गुरुवार) या कालावधीत श्री हनुमान मंदिर, मेंडका येथे मोठ्या भक्तिभावाने संपन्न होत आहे.




सप्ताहादरम्यान दररोज सकाळी ६ ते ७ प्रभात फेरी व काकडा आरती, ७ ते ९ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ हरिकीर्तन असे नियमित धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या सप्ताहात विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा लाभणार आहे. दि. २ जुलै रोजी ह.भ.प. उद्धव महाराज भारती, ३ जुलै रोजी ह.भ.प. रुपालीताई पवनेकर, ४ जुलै रोजी ह.भ.प. दशरथ महाराज मोरे (बारड संस्थान, नांदेड), ५ जुलै रोजी ह.भ.प. बालाजी महाराज गुंडेवार (सिडको, नांदेड), ६ जुलै रोजी भागवताचार्य ह.भ.प. कान्होपात्राताई कुंडलवाडीकर, ७ जुलै रोजी ह.भ.प. शंकर महाराज भारती (चिखलीकर) तसेच ८ व ९ जुलै रोजी ह.भ.प. श्री श्यामसुंदर महाराज आष्टीकर यांचे कीर्तन होणार आहे. सांगता दिनी दुपारी १२ ते २ या वेळेत काल्याचे कीर्तन संपन्न होईल.

दि. ९ जुलै २०२६ रोजी वै. श्री संत ह.भ.प. नारायण महाराज यांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समस्त गावकरी मंडळी, मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) यांनी केले आहे.

## एटीएम कार्डची अदलाबदल करून सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्याची ४० हजारांची फसवणूक;

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : पिंपळगाव बसवंत येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या एटीएम केंद्रात हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करून सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्याच्या खात्यातून तब्बल ४० हजार रुपये काढून घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्तात्रय म्हातारबा निफाडे (वय ७५, रा. एसबीआय बँक कॉलनी, शिरसगाव रोड, पिंपळगाव बसवंत) हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आहेत. दि. २९ जून रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजण्याच्या सुमारास ते पिंपळगाव बसवंत येथील एसबीआयच्या एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी गेले होते.

यावेळी एटीएममध्ये उपस्थित असलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी मदतीच्या बहाण्याने हातचलाखी करत त्यांचे एटीएम कार्ड बदलून घेतले. ही बाब निफाडे यांच्या लक्षात न आणता आरोपींनी त्यांच्या मूळ एटीएम कार्डचा वापर करून खात्यातून ४० हजार रुपये काढून घेतले. काही वेळाने व्यवहाराची माहिती मिळाल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी दत्तात्रय निफाडे यांनी पिंपळगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर दोन अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१६(२), ३१८(४), ३१९(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार निकिता महाले करीत असून, एटीएम केंद्रातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, नागरिकांनी एटीएममध्ये व्यवहार करताना अनोळखी व्यक्तींची मदत घेऊ नये, एटीएम कार्ड व पिनची माहिती कोणालाही देऊ नये तसेच संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## विक्रोळी पार्कसाईट मधील त्रिलोक सोसायटी परिसरात मोठे झाड कोसळले

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** :विक्रोळी पार्कसाईट येथील संजय गांधी नगर परिसरातील त्रिलोक सोसायटीजवळ सतत पडणाऱ्या पावसामुळे काल मोठे झाड अचानक कोसळल्याची घटना घडली.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झाली नाही.मात्र,झाड कोसळल्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.हा डोंगराळ झोपडपट्टीचा भाग असल्यामुळे येथे लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर आहे.या धोकादायक झाडाबाबत दोन दिवसांपूर्वीच भाजपचे वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता तसेच शिवसेना महिला वॉर्ड अध्यक्षा पूजा पवार यांनी मनपा 'एन' विभागाला लेखी पत्र देऊन यावर तातडीने कारवाईची मागणी केली होती. मात्र,स्थानिक मनपा एन विभाग प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.या घटनेची माहिती मिळताच महेश गुप्ता,पूजा पवार तसेच भाजप पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी घटनास्थळी भेट देऊन संबंधित प्रशासन यंत्रणेला याबाबत तातडीने माहिती दिली.तसेच कोसळलेले झाड त्वरित हटवून परिसरातील नागरिकांची गैरसोय आणि भीती दूर करण्यासाठी मनपा 'एन' विभागाने तातडीने पथक पाठवावे,अशी मागणी त्यांनी केली.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा घटना टाळण्यासाठी धोकादायक झाडांचे सर्वेक्षण



करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात,अशी मागणीही स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान,हा परिसर डोंगराळ झोपडपट्टीचा असल्याने स्थानिक आमदार व खासदारांच्या निधीतून विविध ठिकाणी संरक्षक भिंती उभारण्यात आल्या असून त्यामुळे अनेक नागरिकांना संभाव्य दुर्घटनांपासून दिलासा मिळाला आहे.मात्र,काही नागरिक या संरक्षक भिंतींवरच घरे बांधत असल्याने भविष्यात मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेचा विचार करून अशा धोकादायक ठिकाणी बांधकाम टाळावे,असे आवाहन भाजप पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी केले.

## पुर्व परवानगी न घेता बांधकाम व खोदकाम केल्याप्रकरणी डॉ. विजय गायकवाड यांना मालडूंगे ग्रामपंचायतीने दिल्या नोटीसा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/ प्रतिनिधी** : ग्रुप ग्रामपंचात मालडूंगे हद्दीत दिवसेंदिवस विकास होत असतांना अनेक बाहेरील बिगर आदिवासी व्यक्ती या ठिकाणी जमिनी घेवून स्वतःचे फार्म हाउस बनवित असतात. मुंबई येथे राहणार डॉ. विजय गायकवाड यांनी सुध्दा देहरंग धरणालगत जमीन घेतली असून या ठिकाणी मालडूंगे ग्रामपंचातीची कोणतीही पुर्व परवानगी घेतली नाही. तसेच नैना प्राधिकरण विभागाची देखील परवानगी घेतली नसून या ठिकाणी दगडीचे कंपाउंड, बेकायदेशीर माती उत्खन्न व अनाधिकृत बांधकाम केली आहेत.

यासंदर्भात सरंपच श्री. सिताराम चौधरी व ग्रामपंचायत अधिकारी श्री. विनोद मोरे यांनी अधिकृत नोटीस देवून खुलासा मागितला होता व 7 दिवसात केलेले अनाधिकृत बांधकाम काढण्याच्या सुचना देखील दिल्या होत्या. मात्र, या नोटीसला खुलासा न देता उलट अधिक जोमाने काम चालू केले आहे. मी मंत्रालयात शासकीय सेवेत मोठा अधिकारी होतो व आता मी राजकीय पक्षाच्या मोठया पदावर आहे. असे सांगून



स्थानिक व ग्रामपंचायतीतील सदस्यांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न करतांना दिसतात. असे असतांना पुन्हा मालडूंगे ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. सिताराम चौधरी व ग्रामपंचायत अधिकारी श्री. विनोद मोरे यांनी डॉ. विजय गायकवाड यांना अनाधिकृत बांधकामाबाबत आणि नैना प्राधिकारण विभागाची परवानगी घेण्यासाठी नोटीसा बजावल्या आहेत. तसेच, नवीन पनवेल- माथेरान मुख्य रोडवर अपघाती व धोकादायक वळणावर बेकायदेशीर रस्ता बनवला आहे. बेकायदेशीर खोदकामामुळे पावसाच्या पाण्याने पुर्ण माती ही मख्य रस्त्यावर आली असून येथील स्थानिकांना येता-जातांना नाहक त्रास होत आहे. तर अनेक दुचाकी वाहक चालक या मातीवरून घसरून पडत आहेत. त्यामुळे अपघाती व धोकादाय वळणावर केलेला बेकायदेशीर रस्त्यामुळे सातत्याने अपघात व दुघर्टना होवून शकते, याची जाणीव प्रशासनाने व संबधित विभागाने घेणे गरजेचे आहे नाहीतर एखादया दिवसी मोठी दुघर्टना घडू शकते असे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. याला जबाबदार कोण? यासारखे प्रश्न निर्माण झाले आहे.शासकीय सेवेत मोठा अधिकारी व राजकीय पक्षाचा मोठा पदाधिकारी सांगत डॉ. विजय गायकवाड यांनी विविध शासकीय विभागाची केली दिशाभूल.. मालडूंगे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयाकडून या पुर्वी सुध्दा डॉ. विजय गायकवाड यांना अनाधिकृतबांधकाम व बेकायदेशीर माती उत्खन्न केल्या प्रकरणी नोटीसा दिल्या होत्या. मात्र कोणताही खुलासा दिला नाही? पुन्हा दि. 02/07/2026 रोजी ग्रामपंचायतीने नोटीसा दिल्या आहेत.परवानगी न घेता बांधकाम केल्याने नैना प्राधिकरण विभागाची केली फसवणुक? बेकायदेशीर माती उत्खन्न करत पनवेलचे तहसिलदार व महसुल खात्याला मारेल फाटयावर?बेकायदेशीर वृक्ष तोड करून देखील वनविभागाची कारवाई शुन्यू? नवीन पनवेल- माथेरान रोड मख्य रस्त्यालगत अपघाती व धोकादायक वळाणावर बेकायदेशीर रस्ता बनवून गटार नष्ट केला. व या रस्त्यावर सातत्याने अपघात होत आहेत, तरी सार्वजनिक बांधकाम विभाग शांत का? दुघर्टना होण्याची पहातेय वाट?

### बेकायदेशीर बांधकाम व माती उत्खन्न केल्याने सिडको नैना प्राधिकरण विभाग, तहसिलदार, वनविभाग, गटविकास अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांना दिले पत्र

## ८१२ मिमी पाऊस, नद्या-नाले दुथडी भरून वाहतायत; तरीही रानवली धरण अपेक्षेपेक्षा कमी भरले, संबंधित विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यात यंदाच्या पावसाने दमदार हजेरी लावली असून कालपर्यंत एकूण ८१२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे नद्या, नाले आणि ओढे तुडुंब वाहत असून सर्वत्र पावसाचे समाधानकारक चित्र दिसत आहे. मात्र, या सर्व परिस्थितीतही श्रीवर्धन शहर व परिसराला पाणीपुरवठा करणारे रानवली धरण अपेक्षेप्रमाणे भरले नसल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

उपलब्ध माहितीनुसार, कालपर्यंत धरणाच्या पाण्याच्या पातळीत अवघी चार मीटरची वाढ झाली आहे. झालेल्या पावसाच्या प्रमाणाचा विचार करता धरणातील पाणीसाठा किमान आठ मीटरपर्यंत वाढणे अपेक्षित असल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे धरणात पाणी अपेक्षेपेक्षा कमी का साचत आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.



विशेष म्हणजे, यावर्षी उन्हाळ्यात रानवली धरणाने तळ गाठला होता. त्याचबरोबर हवामान खात्याने दोन ते तीन महिन्यांपूर्वीच यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. अशा परिस्थितीत संबंधित विभागाने धरणात अधिकाधिक पाणी पोहोचण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र, डोंगरदऱ्यांमधून वाहणारे पाणी धरणात वळविण्यासाठी कोणताही प्रभावी स्त्रोत विकसित करण्यात आलेला नसल्याचे दिसून येत आहे.याशिवाय, धरणाकडे पाणी आणणाऱ्या पारंपरिक पाटांचीही योग्य देखभाल करण्यात आलेली नाही. या पाटाची शेवटची मोठी साफसफाई २०१२ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर या महत्त्वाच्या जलमार्गाकडे दुर्लक्ष झाल्याने मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी वाया जात असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे.यंदा पावसाचे प्रमाण समाधानकारक असले तरी धरणातील साठा अपेक्षेपेक्षा कमी राहिल्यास भविष्यात पाणीटंचाईची समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने सर्वेक्षण करून धरणाकडे येणारे नैसर्गिक जलमार्ग, पारंपरिक पाट आणि पाण्याचे स्त्रोत विकसित करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.केवळ स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेने मागणी करण्याची वाट न पाहता संबंधित विभागाने स्वतःहून पुढाकार घेऊन दीर्घकालीन जलनियोजन राबविणे ही काळाची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

# अंधश्रद्धेविरुद्ध लढा : शिक्षकांची भूमिका आणि समाजाची जबाबदारी!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : अलीकडेच एका जिल्हा परिषद शाळेत अत्यंत धक्कादायक घटना घडली. अंधश्रद्धेच्या प्रभावाखाली काही अघोरी कृत्ये शाळेच्या परिसरात करण्यात आल्याचे उघड झाले. शिक्षणाच्या पवित्र मंदिरात अशा प्रकारची घटना घडणे ही केवळ खेदजनक बाब नाही, तर आपल्या समाजाच्या विचारसरणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी विवेक, विज्ञान आणि ज्ञान यांची जोपासना व्हावी, त्याच ठिकाणी अंधश्रद्धेची छाया दिसणे अधिक चिंताजनक आहे.

तसेच अलीकडील काळात नाशिक शहरात घडलेल्या धक्कादायक प्रकाराने समाजाला पुन्हा एकदा विचार करायला भाग पाडले आहे. तथाकथित "उपाय", "चमत्कार" आणि "अदृश्य शक्तींचा प्रभाव" या नावाखाली अनेक निरपराध लोकांची फसवणूक होत असल्याचे उघड झाले. विशेषतः महिलांना लक्ष्य करून त्यांच्या भीतीचा आणि भावनिक असुरक्षिततेचा गैरफायदा घेतला गेला.

आज आपण विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेच्या उच्च शिखरावर पोहोचलो आहोत. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झाला, माहिती तंत्रज्ञानामुळे जग एका क्लिकवर आले. तरीदेखील अंधश्रद्धेची पकड अजूनही समाजावर कायम आहे. अलीकडील घटना हेच दाखवते की शिक्षण असूनही माणूस भीती, अज्ञान आणि भावनिक असुरक्षिततेमुळे चुकीच्या मार्गावर जातो.

याच पार्श्वभूमीवर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य प्रकर्षाने आठवते. त्यांनी आयुष्यभर अंधश्रद्धेविरुद्ध लढा दिला आणि विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्याचा ध्यास घेतला. त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे — "प्रश्न विचारा, तर्क करा आणि अंधानुकरण टाळा."

अंधश्रद्धेची मुळे : भीती, अज्ञान आणि असुरक्षितता

अंधश्रद्धा ही अचानक निर्माण होत नाही; तिची मुळे समाजाच्या मानसिकतेत खोलवर रुजलेली आहेत.

**१) भीतीचा प्रभाव :**

"संकट येणार आहे", "दोष आहे", "वाईट शक्तींचा प्रभाव आहे" अशा भीतीदायक गोष्टी सांगून लोकांना मानसिकदृष्ट्या अस्थिर केले जाते. यामुळे लोक तर्कशुद्ध विचार करण्याऐवजी अंधानुकरण करतात.

**२) अज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव :**

नैसर्गिक घटनांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण न समजल्यामुळे अनेक गैरसमज अंधश्रद्धेत परिवर्तित होतात. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या समजुतींना प्रश्न विचारला जात नाही.

**३) भावनिक असुरक्षितता :**

आर्थिक, सामाजिक किंवा कौटुंबिक अडचणींमुळे माणूस कमकुवत होतो. अशा वेळी तो सहजपणे भ्रामक उपायांकडे वळतो.




**वास्तवातील कटू चित्र**

समाजात आजही "चमत्कार" दाखवून लोकांची फसवणूक केली जाते. प्रत्यक्षात हे साधे वैज्ञानिक प्रयोग असतात.

काही ठिकाणी मानसिक तणाव असलेल्या व्यक्तींना "भूतबाधा" म्हणून चुकीचे ठरवले जाते.

विशेषतः महिलांवर "उपाय" या नावाखाली होणारे शोषण हे समाजासाठी लाजिरवाणे आहे.

शाळांमध्येही अशा घटना घडू लागल्या, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

**शिक्षकांची भूमिका : विचारांचे शिल्पकार**

शिक्षक हा समाजाचा दिशादर्शक असतो. तो केवळ माहिती देणारा नसून विद्यार्थ्यांच्या विचारांची घडण करणारा असतो.

**प्रश्न विचारण्याची सवय :**

विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टीवर प्रश्न विचारायला प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. "का?" आणि "कसे?" हे प्रश्न अंधश्रद्धेविरुद्धचे प्रभावी शस्त्र आहेत.

प्रयोग आणि अनुभवाधारित शिक्षण :

विज्ञानाच्या प्रयोगांद्वारे तथाकथित चमत्कारांचे खरे स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून सांगता येते.

**जीवनाशी निगडित शिक्षण :**

समाजातील घडामोडींवर वर्गात चर्चा घडवून विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

विवेक, प्रामाणिकपणा, आत्मविश्वास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांची जोपासना करणे ही शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

**पालक आणि समाजाची जबाबदारी**

शाळा आणि घर यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे.

घरात जर अंधश्रद्धेला खतपाणी घातले गेले, तर शाळेतील शिक्षणाचा प्रभाव कमी होतो.

पालकांनी मुलांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन द्यावे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा आणि चुकीच्या समजुतींना विरोध करावा.

समाजातील प्रत्येक घटकाने विवेकाने वागण्याचा निर्धार केला, तरच खरा बदल घडेल.

विज्ञाननिष्ठ समाजाची गरज

अंधश्रद्धेविरुद्धचा लढा हा केवळ कायद्याचा विषय नाही, तर तो विचारांचा संघर्ष आहे.

आज गरज आहे ती विवेक, तर्क आणि विज्ञान यांचा स्वीकार करण्याची.शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच आपण पुढील पिढीला सुरक्षित, सजग आणि सक्षम समाज देऊ शकतो.

डॉ. दाभोलकरांचा संदेश आजही आपल्याला मार्गदर्शन करतो —

"अंधश्रद्धा सोडा, विवेक स्वीकारा."

**– डॉ. संदीप दत्तात्रेय वारगे**
**संपर्क:९२७२६९८९२४**
**जिल्हा व राज्य आदर्श शिक्षक**
**केंद्रप्रमुख, नागाव (ता. अलिबाग)**

# १जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून श्री महागणपती हॉस्पिटलमधील डॉक्टर्स जनजागृती सेवा संस्थेच्या"कृतज्ञता प्रमाणपत्राने"सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**टिटवाळा(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)** : भारतात दरवर्षी१जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा केला जातो.हा दिवस देशातील महान डॉक्टर आणि पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री डॉ.बिधान चंद्र रॉय यांच्या पुण्यतिथीनिमित्त समर्पित आहे.'ऋग्णसेवा हीच ईश्वर सेवा'असे मानत सर्व डॉक्टर्स निस्वार्थीपणे सेवा देत असतात.त्यांचा सन्मान व्हावा याच उद्देशाने१जुलै या राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून टिटवाळा येथील श्री महागणपती हॉस्पिटलमधील डॉक्टर्सना जनजागृती सेवा



संस्थेच्या वतीने'कृतज्ञता प्रमाणपत्राने 'सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी स्वराज्य रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सुप्रिया आचरेकर, कल्याण-कसारा-कर्जत महिला रेल्वे प्रवासी संघटनेच्या समन्वयक आरती ताई भोईर,समाजसेविका स्वाती गोगटे, श्री महागणपती हॉस्पिटलचे विशेष कार्यकारी अधिकारी विक्रांत बापट यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. जनतेला निरोगी ठेवण्यासाठी डॉक्टर्स करत असलेल्या योगदानाबद्दल आणि प्रयत्नांबद्दल, अत्यंत कृतज्ञता व कौतुकासह प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या उपक्रमांसंदर्भात सविस्तर माहिती दिली,व संस्थेचा संक्षिप्त अहवाल त्यांना देण्यात आला.श्री.महागणपती हॉस्पिटलचे विशेष कार्यकारी अधिकारी विक्रांत बापट यांनी संपूर्ण हॉस्पिटलमधील विभागवार डॉक्टर्सना भेटवून संपूर्ण हॉस्पिटलमधील कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. महागणपती हॉस्पिटलमधील कर्मचारी वृंदांनी विशेष सहकार्य केले.

# गाजावाजा करून उदघाट्न केलेला करंबेली ठाकरवाडी रस्ता पहिल्याच पावसात भुई सपाट?

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यातील पाणी युक्त पुरस्कार प्राप्त खरीवली ग्रामपंचायत हद्दीतील करंबेली ठाकुरवाडी रस्त्याचं काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली परंतु या अधिवाशांच्या जीवनात मूलभूत सुविधा कधी मिळतील व त्याचा उपभोग कधी घेतील हा आणि अनेक प्रश्न निर्माण झाला आहे.

रायगड भूषण श्री संतोष ठाकूर ग्रामसवर्धन सामाजिक संस्था यांच्या नेतृवा खाली गेली चार वर्ष ग्रामस्थ व महिला करमबेली ठाकुरवाडी



मोर्चा आंदोलन करत होते. गावातील काही स्थनिक पुढारी राजकारण करत असल्याने अनेक अडचणी वर मात करून अखेर आमदार महेंद्र थोरवे यांच्या सहकार्यने निधी मंजूर होऊन कामाचे उदघाटन मोठया उत्साहात झाले परंतु ठेकेदार व अभियंता यांच्या निष्क्रियते मुळे रस्त्याचं काम निकृष्ट झाल्याचे दिसत आहे पहिल्याच पावसात रस्त्याची दयनीय अवस्था पाहून सामान्यातला सामान्य माणूस ही सांगू शकतो की हे काम नियोजनबद्ध ( इंस्टुमेंट प्रमाणे) झालेले नाही सदर

**•75 वर्षानंतर ही आदिवासी बांधवांच्या पदरी पुन्हा निराशा**
**•संबंधित ठेकेदार व बांधकामं अभियंता यांच्यावर कारवाईची ग्रामस्थ यांची मागणी**
**•मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा खालापूर तालुक्यात अनेक ठिकाणी बोंबाबोंब**

रस्त्याचे कामाची पाहणी करून मग ठेकेदाराचा बिल काढावा अन्यथा आम्ही आदिवासी बांधव रस्त्याचे काम करून देणार नाही असं बोलले जात आहे.

# गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये उत्साहात शाळा प्रवेशोत्सव

**दैनिक युवक आधार**
**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत जिल्ह्यातील सर्व 11 शासकीय व 23 अनुदानित आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक वर्ष 2026-27 च्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांना शाळेची ओढ निर्माण व्हावी, शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार व्हावे आणि नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आनंददायी वातावरणात स्वागत व्हावे, या उद्देशाने प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील आश्रमशाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी बैलगाडीतून



विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली, तर काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पाठ्यपुस्तके व भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात आदिवासी आश्रमशाळांमध्ये 4,266 विद्यार्थी प्रवेशित होते. चालू शैक्षणिक वर्षात सुमारे 900 नव्या प्रवेशांची वाढ अपेक्षित असून विद्यार्थ्यांची एकूण संख्या लक्षणीयरीत्या वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

आदिवासी आश्रमशाळांमधील प्रवेश वाढविण्यासाठी मा. डॉ. अशोक उईके, आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. लिना बनसोड, आयुक्त, आदिवासी विकास विभाग तसेच मा. आयुषी सिंग, अपर आयुक्त यांनी विशेष सूचना दिल्या होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रवेश अभियान राबविण्यात आले. तसेच आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आदिवासी पालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आली. त्यामुळे यंदा आश्रमशाळांमधील प्रवेशसंख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.याशिवाय, शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये प्रकल्प कार्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये समर कॅम्प, विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव देणारे उपक्रम, NEET परीक्षेचे प्रशिक्षण, गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी विशेष प्रशिक्षण, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे वितरण तसेच इयत्ता 5 वी व 7 वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात आले.

# विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा आमदार गजानन लवटे यांचा वाढदिवस

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे | तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार गजाननभाऊ लवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात व समाजोपयोगी वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त शिवसेना युवासेनेच्या पुढाकाराने दिवसभर विविध सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मंदिरात महाआरतीने झाली. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयात दाखल रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद शाळा व निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या उपक्रमांमधून सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि लोकहिताची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस न राहता समाजोपयोगी



कार्यातून साजरा करण्याचा आदर्श या उपक्रमातून घालून देण्यात आला.

यावेळी शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच आमदार गजाननभाऊ लवटे यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आमदार लवटे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

उपस्थित मान्यवर : युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, बबनराव विल्हेकर, महेंद्र दिपटे, गुणवंत पाटील गावंडे, मोहन पाटील बायरकर, मंगला ताई तराळे, स्नेहा ताई देशमुख, सागर गिरे, शुभम विल्हेकर, दर्शन गवई, संदीप हरणे तसेच शिवसेना व युवासेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सुरगाणा महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे पुण्यतिथी साजरी

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे संस्थापक लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ४६ जयंती साजरी करण्यात आली .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिघावकर यांनी कै.व्यंकटराव हिरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार




अर्पण करण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, सार्वजनिक जीवनात वावरताना समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत ज्ञान दाणाचे पवित्र कार्य करणाऱ्यात हिरे घराणं आजही अग्रेसर आहे. कै.व्यंकटराव हिरे हे सहकार आणि शिक्षण क्षेत्रात नावाजलेले लोकनेते त्यांनी समाजकार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळात सहकार,कृषी विभागात राज्यमंत्री म्हणून काम केले. गोर गरीब जनतेसाठी विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण ते उच्च महाविद्यालयीन शिक्षणाचा मार्ग मोकळा केला आहे असे सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.रविंद्र हिरे यांनी केले तर आभार प्रा. उपप्राचार्य प्रा विजय अहिरे यांनी मानले.यावेळी कार्यक्रमाला डॉ.चंद्रकांत पाटील,प्रा. सुरेश भोये,प्रा. विनायक बागुल,प्रा.कविता भोये , प्रा.भगवान महाले,प्रा. बाळू धुम, राजेंद्र शिंदे, मुरलीधर देशमुख, ओमकार धुम,नाना कोर,हेमंत चौधरी, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी उपस्थित होते.

# भवानीनगर शाळा परिसरात रोडरोमिओंचा हैदोस ; सुसाट दुचाक्यांमुळे चिमुकल्यांच्या जीवाला धोका!

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : भवानीनगर येथील शाळा सुरू होताच भवानीनगर येथील इंग्लिश मिडीयम स्कूलच्या गेट समोर रोडरोमिओंचा वावर वाढल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शाळा भरताना व सुटताना काही तरुण सुसाट वेगाने दुचाकी चालवत सायलेंसरचा मोठा आवाज करत परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत असल्याचा आरोप महिला पालकांनी केला आहे.

विशेष म्हणजे,अनेक अल्पवयीन विद्यार्थीही दुचाकी चालवत असल्याचे चित्र दिसून येत असून त्यामुळे शाळेत येणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्रवेशद्वारासमोर काही कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विनाकारण थांबत असल्याने पालकांना आपल्या मुलांना शाळेत सोडताना व घेऊन जाताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सुसाट वेगाने धावणाऱ्या दुचाक्या, कर्कश आवाज आणि बेफिकीर वाहनचालकांमुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. संबंधित प्रशासनाने अपघाताची वाट न पाहता तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. महिला पालकांनी शाळेच्या दोन्ही बाजूंना तात्काळ गतिरोधक बसविणे, शाळा सुरू व सुटण्याच्या वेळेत पोलीस बंदोबस्त ठेवणे, अल्पवयीन वाहनचालकांवर कठोर कारवाई करणे तसेच रोडरोमिओंना आळा घालण्यासाठी नियमित गस्त वाढविण्याची मागणी केली आहे."एखाद्या निष्पाप विद्यार्थ्याला धोका झाल्यानंतर प्रशासन जागे होणार का?"असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पनवेल येथे राजपाल शेगोकार व अश्विनी ठाकूर यांचा सत्कार

## उत्साहात वाढदिवस साजरा







**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने पनवेल येथील शासकीय विश्रामगृहात रायगड जिल्हा सचिव तथा शिवधर्म वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक राजपाल शेगोकार आणि राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ संचालित अन्याय अत्याचार निवारण समितीच्या रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी ठाकूर यांचा वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर केक कापून अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दोन्ही मान्यवरांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. अनेक वक्त्यांनी राजपाल शेगोकार यांच्या निर्भीड पत्रकारिता, सत्यासाठीची भूमिका, सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविण्याची वृत्ती तसेच सर्वसामान्यांच्या न्यायासाठी केलेल्या संघर्षाचे विशेष कौतुक केले. पत्रकारिता आणि समाजकारण यांचा सुंदर समन्वय साधत त्यांनी समाजात विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

तसेच अश्विनी ठाकूर यांच्या महिला सक्षमीकरणासाठीच्या कार्याची, अन्यायग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या जिद्दीची आणि समाजहितासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची उपस्थितांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. त्यांचे नेतृत्व, कार्यतत्परता आणि सामाजिक बांधिलकी ही संघटनेसाठी प्रेरणादायी असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात बोलताना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी राजपाल शेगोकार आणि अश्विनी ठाकूर ही दोन्ही व्यक्तिमत्त्वे संघटनेची मोठी ताकद असून त्यांनी आपल्या प्रामाणिकपणा, निष्ठा, धाडसी निर्णयक्षमता आणि सातत्यपूर्ण कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सांगितले. भविष्यातही त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक व्यापक होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रवी नाईक, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सचिन गायकवाड, रायगड जिल्हा उपाध्यक्ष दत्तू ठोके, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख कैलास राजे घरत उरण तालुका अध्यक्ष प्रवीण नाईक , खालापूर तालुकाध्यक्ष बालाराम सावंत, मंगेश कुठले दैनिक युवक आधारचे मुख्य संपादक डॉ, आमले साहेब अब्दुल तसेच राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ, अन्याय अत्याचार निवारण समिती, रिक्षा चालक-मालक संघटना आणि विविध सामाजिक क्षेत्रातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुभेच्छा, सत्कार आणि कौतुकाच्या वर्षावात पार पडलेल्या या सोहळ्याने राजपाल शेगोकार आणि अश्विनी ठाकूर यांच्या कार्याला उपस्थितांनी मनःपूर्वक सलाम करत त्यांच्या पुढील सामाजिक, पत्रकारितेतील आणि संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दु:खद निधन: 107 वर्षे जगणाऱ्या लक्ष्मीबाई दामाजी डवले यांचे अल्पशा आजाराने निधन, गावावर शोककळा




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार माणगांव :** माणगांव तालुक्यातील नाईटणे गावातील ज्येष्ठ नागरिक व माजी पोलीस पाटील कै. दामाजी नथु डवले यांच्या धर्मपत्नी लक्ष्मीबाई दामाजी डवले यांचे दि. 30/6/2026 रोजी रात्री 10 वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्या 107 वर्षांच्या होत्या.

**शतकपूर्तीचा प्रवास संपला:**107 वर्षांचे दीर्घायुष्य: लक्ष्मीबाई डवले यांनी तब्बल 107 वर्षांचे आरोग्यपूर्ण आयुष्य जगले. त्या पंचक्रोशीतील सर्वात ज्येष्ठ नागरिक होत्या.

**अल्पशा आजाराने एक्झिट:** गेल्या दोन दिवसांपासून त्यांना थोडा त्रास होत होता. राहत्या घरीच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. *माजी पोलीस पाटलांच्या पत्नी*: कै. दामाजी नथु डवले हे गावचे आदरणीय माजी पोलीस पाटील होते. लक्ष्मीबाई त्यांच्या पश्चात कुटुंबाचा आधार होत्या.

**चार पिढ्यांचा संसार:** त्यांच्या पश्चात 3 मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. चार पिढ्या त्यांनी पाहिल्या.

**गावाची प्रतिक्रिया:** "आजी म्हणजे गावचं चालतं-बोलतं इतिहासाचं पुस्तक होत्या. स्वातंत्र्यापासून आजपर्यंतचा सगळा काळ त्यांनी पाहिला. त्यांच्या जाण्याने गाव पोरकं झालं" अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.गेल्या वर्षातच त्यांनी आपल्याला लागणारे पांघरून शिवून दिल्या होत्या तसेच त्यांचा आवाज म्हणजे पुर्ण गावांत जाईल असं खणखनीत होत. वय 107, पण आवाजात तेवढाच जोर. कुणाला हाक मारली की गल्लीच्या टोकापर्यंत ऐकू जायची. काल संध्याकाळपर्यंत नातवंडांना गोष्टी सांगत होत्या, सुनेला स्वयंपाकाचे टिप्स देत होत्या. फक्त 2 तास थकल्या आणि शांतपणे गेल्या."आजी म्हणजे आमची ताकद होती. 107 वर्षांत कधी आजारी पडल्या नाहीत. डॉक्टर काय असतो ते त्यांना माहितच नव्हतं. आणि आवाज? अहो पोलीस पाटलांपेक्षाही खणखणीत!" - असे नातवाने सांगितले. नाईटणेचं चालतं-बोलतं इतिहासाचं पुस्तक हरपलं. स्वातंत्र्याचा लढा, आणीबाणी, गावचा विकास... सगळं डोळ्यांनी पाहिलं होतं त्यांनी.

# जोगेश्वरीत १०० वर्षे जुन्या दुकानावर झाड कोसळल्याने मोठे नुकसान







**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर विभागीय संपादक :** जोगेश्वरी पूर्व येथील जेव्हीएलआर (JVLR) रोड जंक्शन परिसरात सोमवारी दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास अचानक मोठे झाड कोसळून शंभर वर्षांहून अधिक जुने असलेल्या दोन दुकानांचे मोठे नुकसान झाले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, 'शुभ क्रिएशन' आणि 'पूजा ऑटो पार्ट्स' या दुकानांवर अचानक मोठे झाड कोसळल्याने दुकानांचे पत्रे, फलक, शटर तसेच आतील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेच्या वेळी परिसरात नागरिकांची वर्दळ होती. मात्र, प्रसंगावधानामुळे कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. या दुर्घटनेमुळे संबंधित व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, नुकसानभरपाईची मागणी करण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते तसेच श्री चंडिका देवी गृहनिर्माण संस्था (SRA) चे पदाधिकारी आणि संस्थेचे अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांची भेट घेऊन झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तात्काळ पंचनामा करून व्यापाऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी तातडीने झाड हटविण्याचे काम हाती घेत परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या. काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला असला तरी प्रशासनाच्या तत्परतेमुळे परिस्थिती लवकर नियंत्रणात आली.या घटनेनंतर परिसरातील जुन्या व धोकादायक झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक छाटणी किंवा इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी महानगरपालिकेने धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# वनमहोत्सव सप्ताहानिमित्त निफाड नगरपंचायतीचा बीजगोळे निर्मिती उपक्रम



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** वनमहोत्सव सप्ताहानिमित्त निफाड नगरपंचायतीच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २, निफाड येथे बीजगोळे (सीडबॉल) तयार करण्याचा उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे तसेच शहरात वृक्षलागवडीला चालना देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धिरज भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी माती, शेणखत आणि विविध वृक्षांच्या बियांचा वापर करून मोठ्या उत्साहाने बीजगोळे तयार केले.

यावेळी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व, जैवविविधतेचे संरक्षण तसेच 'माझी वसुंधरा' अभियानाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. भविष्यात हे बीजगोळे योग्य ठिकाणी विखुरून नैसर्गिक पद्धतीने वृक्षसंवर्धनाला चालना देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात मुख्याध्यापिका अरुणा महाजन यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. तसेच शिक्षक धर्मेंद्र सोनवणे, मनीषा कर्डिले आणि सुरेखा खैरनार यांनीही विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगितले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून, वनमहोत्सव सप्ताहानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

# जनतेचा विश्वास जिंकणारे पोलीस निरीक्षक गणेश गुरव; निफाडकरांकडून गौरवपूर्ण निरोप



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश चंद्रकांत गुरव यांनी आपल्या कार्यकाळात कर्तव्यदक्ष, धाडसी आणि लोकाभिमुख अधिकारी म्हणून निफाडकरांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी घेतलेल्या प्रभावी पुढाकारामुळे त्यांच्याविषयी नागरिकांमध्ये विशेष आदराची भावना निर्माण झाली. त्यांच्या बदलीची बातमी समोर येताच निफाड शहरासह तालुकाभरातून हळहळ व्यक्त करण्यात येत असून, नागरिकांनी त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला.गुरव यांनी आपल्या कार्यकाळात गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेत अनेक गंभीर गुन्ह्यांचा यशस्वी तपास लावला. चोरी, घरफोडी, दरोडे, मारामारी, चेन स्नॅचिंग यांसारख्या विविध गुन्ह्यांतील आरोपींना अल्पावधीत अटक करून त्यांनी गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा प्रभावी धाक निर्माण केला. त्यांच्या नेतृत्वाखाली निफाड पोलीस ठाण्याने अनेक उल्लेखनीय कारवाया करत गुन्हेगारीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविले. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली.महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. शाळा व महाविद्यालय परिसरात नियमित गस्त, छेडछाडविरोधी मोहिमा, जनजागृती उपक्रम आणि संवेदनशील पोलिसिंगमुळे महिला व पालकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. महिलांशी संबंधित तक्रारींवर तत्परतेने कारवाई करून त्यांनी "पोलीस म्हणजे विश्वास" ही भावना अधिक मजबूत केली.अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी गुरव यांनी विशेष मोहीम राबवत संबंधितांविरोधात कठोर कारवाई केली. तरुण पिढी व्यसनापासून दूर राहावी यासाठी जनजागृती कार्यक्रमांनाही त्यांनी प्राधान्य दिले. समाजातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवायाही प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

त्यांच्या कार्यकाळातील आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे निफाड पोलीस ठाण्याच्या परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले अतिक्रमण हटवून परिसराचे सुशोभीकरण करणे. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याला नवीन, स्वच्छ, प्रशस्त आणि शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले. या कामगिरीचे नागरिकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही कौतुक केले. गुरव यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांचा माणुसकीचा दृष्टिकोन. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आणि न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले.

त्यांच्या बदलीची माहिती मिळताच विविध सामाजिक संस्था, व्यापारी, शेतकरी, युवक आणि नागरिकांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. "गुरव साहेबांनी आणखी काही काळ निफाडमध्ये सेवा द्यावी," अशी भावना अनेकांनी बोलून दाखवली. त्यांच्या कार्यामुळे पोलिसांविषयीचा लोकांचा विश्वास अधिक बळकट झाला असून, निफाडला एक कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि लोकाभिमुख अधिकारी गमवावा लागत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, धाडस आणि जनसेवेची अखंड तळमळ या गुणांच्या बळावर पोलीस निरीक्षक गणेश चंद्रकांत गुरव यांनी निफाडमध्ये आदर्श पोलिसिंगचा ठसा उमटविला. त्यांच्या कार्याचा ठसा निफाडच्या इतिहासात कायम स्मरणात राहील, असा विश्वास व्यक्त करत निफाडकरांनी त्यांच्या पुढील सेवाप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांना भावपूर्ण आणि सन्मानपूर्वक निरोप दिला.

# पर्यावरण रक्षणासाठी आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र अद्ययावत ठेवावे

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पर्यावरण रक्षणासाठी आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र त्वरित अद्ययावत ठेवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम, 1989 मधील नियम 115 व 116 अंतर्गत वाहनामधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण व त्याबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाचा थेट आणि गंभीर परिणाम मानवी आरोग्य व पर्यावरणावर होत असल्याने उच्च न्यायालयाने (Suo Motu PII. No. 03 of 2023) देखील या संदर्भात अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम आणि न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांची निर्धारीत कालावधीनंतर मान्यताप्राप्त संगणकीय प्रदूषण नियंत्रण केंद्रांमार्फत (PUC Centers) ऑनलाइन पद्धतीने प्रदूषण नियंत्रण चाचणी करून घेणे व त्याचे वैध प्रमाणपत्र सोबत बाळगणे कायदेशीररीत्या अनिवार्य आहे. सर्व वाहनमालक आणि चालकांनी जर वाहनाचे वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत् अद्ययावत नसणाऱ्या तसेच रस्त्यांवर संशयास्पद वाटणाऱ्या प्रदूषक वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाचे वायूवेग पथकांद्वारे मोटार वाहन कायदा, 1988 आणि मोटार वाहन नियम, 1989 अंतर्गत विविध कलमांखाली कडक दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

या कार्यालयाचे वायुवेग पथकामार्फत सन एप्रिल 2025 ते मार्च 2026 या कालावधीत एकूण 6 हजार 598 इतक्या वाहनांवर कारवाई करुन 13.19 कोटी रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे.

तसेच एप्रिल 2026 ते जून 2026 या कालावधीत एकूण 1 हजार 266 वाहनांवर कारवाई करुन 25.32 लाख इतका दंड आकारण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मणराव चिकटे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : शिक्षण क्षेत्रात तब्बल ३६ वर्षे प्रामाणिक, निष्ठेने व विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोनातून सेवा बजावणारे ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मणराव चिकटे यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित सेवागौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या प्रसंगी भारतीय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पाटील यांच्या हस्ते श्री. लक्ष्मणराव चिकटे व त्यांच्या धर्मपत्नी सौ. अलका चिकटे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळयांच्या कडकडाटात सत्कारमूर्तींचा गौरव केला.



लक्ष्मणराव चिकटे यांनी आपल्या ३६ वर्षांच्या शैक्षणिक सेवेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले. शिस्त, गुणवत्ता, संस्कार आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता या गुणांमुळे त्यांनी विद्यार्थी, पालक व सहकारी शिक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात अनेक विद्यार्थी उच्च पदांवर पोहोचले असून, समाजाभिमुख शिक्षणाचा आदर्श त्यांनी कायम जपला.

कार्यक्रमात मुख्याध्यापक एस. बी. पाटील, प्राचार्य एस. बी. माळे, एन. एल. तळेले, संजय डमाळे, शेख सर आणि व्ही. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना लक्ष्मणराव चिकटे यांच्या कार्याचा गौरव केला. वक्त्यांनी चिकटे यांच्या प्रामाणिक सेवा, विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम, कर्तव्यनिष्ठा व साधेपणाचा विशेष उल्लेख करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना लक्ष्मणराव चिकटे यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत संस्थाध्यक्ष, सहकारी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. सेवाकाळात मिळालेल्या सहकार्यामुळेच आपली कारकीर्द यशस्वी झाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या सोहळ्यास एम. आर. तुपे, चन्नावत सर, दहीहंडे साहेब, स्वामी मॅडम, कांबळे मॅडम, पी. ए. पाटील, नेहाते मॅडम, मेटे सर, के. आर. फुके, पी. के. दौड, प्रा. अजय पाटील, पी. जी. पवार, भिवरावजी बलांडे, सन्नासे मॅडम, कदम मॅडम, प्रा. डॉ. गोपीनाथ डापके, बाजीराव डापके, रामकृष्ण चव्हाण, गणेश काकडे, कोतिक चिकटे, संजय चिकटे, स्वप्निल चिकटे, अमोल गव्हाणे तसेच अनेक आप्तेष्ट, मित्रमंडळी, शिक्षक, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन देवकर सर यांनी केले, तर पी. जी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. संपूर्ण सेवागौरव सोहळा अत्यंत भावनिक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.

# पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघाच्या वतीने 'विद्यार्थी गुण–गौरव सोहळा'; विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासाठी 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे पार पडणार आहे.या कार्यक्रमात ५ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार असून त्यांना मोफत वह्यांचे वाटप देखील करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देत त्यांच्या यशाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संघाच्या वतीने देण्यात आली.

कार्यक्रमासाठी मा. श्री. अँड. धनराज वंजारी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निलमताई पोतले-वढघुले तसेच मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य किसन सावंत यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमात डॉ.अक्षदा महेंद्र गडगे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम विशेषतः पुणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला असून विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर, उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज आणि खजिनदार महेंद्र गडगे यांनी केले आहे.

# निर्मल नगरीतील श्री संत गजानन महाराज मंदिरात ३६ वे सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथ पारायण संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात रविवारी आयोजित करण्यात आलेले ३६ वे सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथ पारायण अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित या वार्षिक धार्मिक सोहळ्यास नागपूर शहरातील व परिसरातील हजारों भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



सकाळी श्रींच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण, प्रकट वाचन, महाआरती आणि नामस्मरणाचा कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला. मंदिरातील "गण गण गणात बोते" आणि भजनाच्या जयघोषाने दुमदुमून गेला. दुपारी 12 वाजता सर्व उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या सेवकांनी अथक परिश्रम घेतले.

## पोलीस निरीक्षक कोळी साहेबांच सुनीलदादा बालपांडे यांच्या हस्ते शाल देऊन सत्कार व स्वागत

यावेळी पोलीस निरीक्षक कोळी साहेबांच सुनीलदादा बालपांडे यांच्या हस्ते शाल देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित भाविकांनी ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करत अशाच धार्मिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी भावना व्यक्त केली. या धार्मिक सोहळ्यामुळे भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण झाले असून, उपस्थित भाविकांनी श्रींचे दर्शन घेऊन पारायणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

## शरद नहाटे यांना लोकमत सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान !!

# अकोला जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा!!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : ग्रामीण भागाच्या विकासात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आणि आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या अकोट तालुक्यातील जळगाव नहाटे येथील सरपंच शरद ज्ञानदेवराव नहाटे यांना 'लोकमत सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार – २०२६' या अत्यंत मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

मुंबई येथील नरिमन पॉईंट येथील प्रसिद्ध यशवंतराव चव्हाण सभागृहात२ जुलै २०२६ रोजी आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शुभहस्ते शरद नहाटे यांना हा गौरवपूर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**ग्रामविकासाच्या उल्लेखनीय कार्याची दखल:**

लोकमत समूहाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंचांचा शोध घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली जाते. अकोट तालुक्यातील जळगाव नहाटे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शरद नहाटे यांनी राबविलेल्या विविध लोककल्याणकारी योजना, ग्रामविकासाची कामे आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांची दखल घेत या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. मुंबईत झालेल्या या दिमाखदार सोहळ्याला राज्यातील अनेक दिग्गज नेते, प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

शरद नहाटे यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे केवळ अकोट तालुक्याचेच नव्हे, तर संपूर्ण अकोला जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर अभिमानाने झळकले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून आणि राजकीय, सामाजिक स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

"हा पुरस्कार म्हणजे जळगाव नहाटे येथील जनतेने दाखवलेला विश्वास आणि सहकार्याचे फळ आहे," अशा भावना याप्रसंगी व्यक्त होत आहेत. शरद नहाटे यांच्या या गौरवपूर्ण सन्मानाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही त्यांच्या हातून समाजहिताचे व ग्रामविकासाचे असेच प्रेरणादायी कार्य घडत राहो, अशा सदिच्छा नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# सारोळा येथील शिक्षक विकास ढोबळे यांची केंद्रप्रमुखपदी पदोन्नती

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सारोळा येथील उपक्रमशील व आदर्श पदवीधर प्राथमिक शिक्षक विकास भगवान ढोबळे यांची विभागीय केंद्रप्रमुख परीक्षा-२०२५ अन्वये 'केंद्रप्रमुख' म्हणून पदोन्नती झाली असून, त्यांची नियुक्ती वडोद बाजार (ता. फुलंब्री) केंद्र येथे करण्यात आली आहे.



शिक्षक विकास ढोबळे यांनी सारोळा शाळेत विविध उपक्रम राबवत शाळेच्या विकासामध्ये मोठा हातभार लावला आहे. त्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सुधाकर बावस्कर, सरपंच मोहन गायकवाड, उपसरपंच नारायण वराडे, पोलीस पाटील सुधाकर काकडे, अध्यक्ष गजानन गोरे, उपाध्यक्ष बबन वराडे, तसेच सदस्य सर्वश्री सुभाष काकडे, संजय काळे, अनिल दांडगे, मच्छिंद्र दांडगे, दीपक सनान्से, संदीप साळवे आणि गणेश वराडे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, विद्यार्थी आणि गावकरी मंडळींनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुख्याध्यापक बावस्कर यांचा वाढदिवस साजरा

याच कार्यक्रमानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुधाकर बावस्कर यांचा वाढदिवस देखील मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून मुख्याध्यापकांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

# ज्ञानविकास विद्यालयात 'POSH' कायद्याची तपासणी; नियमांच्या अंमलबजावणीवर भर

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : महिला व बाल विकास विभागाच्या निर्देशानुसार, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम, २०१३ (POSH Act-2013) च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सिल्लोड येथील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती सुनिता सनान्से यांनी ज्ञानविकास विद्यालय, भराडी येथे भेट देऊन कायदेशीर तपासणी केली.




या तपासणीदरम्यान श्रीमती सनान्से यांनी संस्थेतील अंतर्गत तक्रार समितीची (Internal Committee) स्थापना, समितीची वैधानिक रचना, तक्रार नोंदवहीचे संधारण, महिला कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणारे जनजागृती उपक्रम आणि विद्यालयाच्या परिसरात लावण्यात आलेले माहिती फलक, या सर्व तांत्रिक बाबींची सविस्तर पडताळणी केली. यावेळी त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित, सन्मानजनक आणि कायद्यास अनुसरून कार्यस्थळ निर्माण करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तक्रार निवारण यंत्रणा सदैव सक्षम आणि कार्यरत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जाधव आर. एस. यांनी तपासणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे आणि माहिती उपलब्ध करून दिली. कायद्यातील सर्व तरतुदींचे काटेकोर पालन करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी अशा प्रकारच्या तपासण्या महत्त्वपूर्ण असून, यामुळे कार्यस्थळी अधिक सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समितीमध्ये श्रीमती अनिता टाकळकर, श्रीमती संगीता पाटील, श्रीमती उषा राकडे, श्रीमती बेबी भडगे, श्रीमती सुनीता काकडे, श्रीमती वंदना पालकर आणि श्रीमती जयश्री ढोणे यांचा समावेश आहे. या सदस्यांसह शिक्षिका आणि माता-पालक समिती महिलांवरील अन्याय-अत्याचाराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि विशेष दक्षता बाळगण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# मुंगसाजी नगरात वृक्षारोपणाचा संकल्प

# आदिवासी समाजाचे सामाजिक कार्यकर्ते अक्षय मस्के यांनी दिला पर्यावरण संरक्षणाचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : वाढते प्रदूषण, बेसुमार वृक्षतोड, हवामानातील सातत्याने होत असलेले बदल, वाढते तापमान आणि पावसाचे अनियमित चक्र यामुळे पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस ढासळत चालला आहे. अशा गंभीर परिस्थितीत केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता समाजातील प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. याच सामाजिक जाणिवेतून मुंगसाजी नगर परिसरात आदिवासी समाजाचे सामाजिक कार्यकर्ते अक्षय मस्के यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबविला.

या उपक्रमांतर्गत विविध प्रकारची पर्यावरणपूरक व सावली देणारी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण करताना केवळ झाडे लावून औपचारिकता पूर्ण न करता, ती मोठी होईपर्यंत नियमित पाणी, खत, संरक्षण आणि संगोपन करण्याचा संकल्पही करण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांना आणि युवकांनाही वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.



अक्षय मस्के यांनी सांगितले की, "आज आपण निसर्गाकडून भरभरून घेत आहोत, मात्र त्याला परत देण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या वाढदिवसानिमित्त, स्मृतिदिनानिमित्त किंवा कोणत्याही शुभ प्रसंगी किमान एक झाड लावून त्याचे संगोपन केले, तर भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि हिरवेगार वातावरण मिळू शकते."

सध्या शहरांसह ग्रामीण भागातही वृक्षांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्याचा परिणाम म्हणून उन्हाची तीव्रता वाढत असून, पाण्याचे स्रोत आटत आहेत. प्रदूषणामुळे अनेक आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक झाड हे पर्यावरणाचे रक्षण करणारे एक नैसर्गिक कवच असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंगसाजी नगर परिसरात करण्यात आलेल्या या वृक्षारोपण उपक्रमामुळे परिसर अधिक हिरवागार करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, भविष्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला. याशिवाय लावण्यात आलेल्या प्रत्येक झाडाची नियमित देखभाल करून ती जगविण्यासाठी विशेष लक्ष दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, सामाजिक कार्यकर्ते अक्षय मस्के यांच्या पर्यावरणप्रेमाचे कौतुक केले आहे. समाजातील युवकांनी अशा उपक्रमातून प्रेरणा घेऊन आपल्या गावात, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी तसेच मोकळ्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली.आजच्या काळात वृक्ष लागवड ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून ती भविष्यातील पिढ्यांप्रती असलेली नैतिक बांधिलकी आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी प्रत्येक हाताने एक झाड लावले, तर भविष्यातील अनेक संकटांवर मात करता येईल. अक्षय मस्के यांनी केलेला हा उपक्रम समाजासाठी एक आदर्श ठरत असून, "एक झाड एक जीवन" हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी दिला आहे.

# कांदा खरेदी वाढविण्यासाठी नाफेडने जनजागृती करावी; जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे निर्देश

## लासलगाव बाजार समितीला भेट देत कांदा खरेदीचा घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : जिल्ह्यात नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून सुरू असलेल्या कांदा खरेदीला अधिक गती मिळावी, तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे यासाठी नाफेडने प्रभावी जनजागृती मोहीम राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीला दिलेल्या भेटीदरम्यान त्यांनी कांदा खरेदीच्या प्रक्रियेचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी गुरुवारी सायंकाळी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात नाफेडकडून सुरू असलेल्या कांदा खरेदीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण (मालेगाव), निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, बाजार समितीच्या संचालिका सुवर्णा जगताप, व्यापारी संचालक प्रवीण कदम, सचिव नरेंद्र वाढवणे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



यावेळी बोलताना जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, नाफेडमार्फत कांदा खरेदी सुरू असून आतापर्यंत वेळोवेळी खरेदी दरात वाढ करण्यात आली आहे. सध्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १,८७५ रुपये दर मिळत आहे. या खरेदीविषयी अनेक शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नसल्याने बाजार समितीच्या दर्शनी भागात जनजागृतीपर फलक लावावेत. तसेच नाफेडने स्वतंत्र दोन कर्मचारी नियुक्त करून शेतकऱ्यांना खरेदीची नियमावली, पात्रता, दर आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

लासलगावमध्येही मालेगाव व पिंपळगाव बसवंतप्रमाणे कांदा खरेदीचे प्रमाण वाढविण्याची आवश्यकता असल्याचे सांगत त्यांनी लिलाव प्रक्रिया संपल्यानंतरही नाफेडचे किमान दोन कर्मचारी बाजार समितीत उपस्थित राहून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करावे, तसेच जास्तीत जास्त कांद्याची खरेदी व्हावी यासाठी समन्वयाने काम करावे, असेही स्पष्ट केले.

कांदा खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी बाजार समितीने देखरेख ठेवावी. सरसकट पात्र कांद्याची खरेदी होईल, यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या.

भेटीदरम्यान जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी नाफेडचे शाखा व्यवस्थापक अनिकेत मदान आणि एनसीसीएफचे व्यवस्थापक श्री. हर्ष यांच्यासमवेत सविस्तर चर्चा केली. यावेळी लासलगाव बाजार समितीतील कांद्याची दैनंदिन आवक, आतापर्यंत झालेली खरेदी, शेतकऱ्यांचा प्रतिसाद आणि खरेदी प्रक्रियेतील अडचणींचा आढावा घेण्यात आला.

याप्रसंगी बाजार समितीचे सहाय्यक सचिव प्रकाश कुमावत, लासलगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांच्यासह बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांमुळे नाफेडच्या कांदा खरेदी मोहिमेला अधिक गती मिळून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील दोन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती करिता निवड

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे उपसंपादक महाराष्ट्र :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळांमध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त शाळा, विविध उपक्रम राबवणारी शाळा तसेच सर्व शालेय स्पर्धा परीक्षा मध्ये विद्यार्थी पात्र असलेली शाळा म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा केंद्र किर्ला तालुका मंठा जिल्हा जालना ही होय.मागील वर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची निवड यादी कालच प्रसिद्ध झाली .या यादीमध्ये दुधा येथील इयत्ता आठवीच्या दोन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती करिता निवड झालेली आहे यामध्ये सार्थक रामेश्वर खुळे व स्नेहल




संजय जाधव या दोन विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती मिळणार आहे .या विद्यार्थ्यांच्या यशा करिता तळमळीने मेहनत घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री. विजय कांगणे सर ,श्री. निलेश पिसे सर व श्री पंजाब दांदडे सर व शाळेला सर्वतोपरी मदत करणारे दुधा येथील सर्व पालक यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री क्षीरसागर साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी सन्माननीय के.जी. राठोड सर, किर्ला केंद्राचे केंद्रप्रमुख श्री खरात सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती दुधा ग्रामपंचायत कार्यालयात दुधा या सर्वांनी अभिनंदन केले.

## वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शालेय, साहित्य वितरण

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** मानव हा समाजशील प्राणी आहे. व समाजाप्रती आपले काही देणं आहे. हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासणारे सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणारे पिपरी पुनर्वसन येथील सामाजिक कार्यकर्ते, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद जिल्हा भंडाराचे अध्यक्ष, माजी सरपंच नाशिक चवरे यांनी नुकतेच आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवून जिल्हा परिषद उच्च




प्राथमिक शाळा पिपरी, अंगणवाडी केंद्र पिपरी येथील विद्यार्थ्यांना नोटबुक पेन इत्यादी शालेय साहित्य वितरण करून विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा केला. एस चवळे करिअर अकॅडमी पिपरी येथेही विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करून विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून यशाचे शिखर गाठावे, व्यसनमुक्त तरुण व समाज घडवून समाजामध्ये आदर्श निर्माण करावे असे मार्गदर्शन केले. मागील अनेक वर्षापासून नाशिक चवरे हे विविध सामाजिक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपला वाढदिवस साजरा करतात हे विशेष यावेळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथील मुख्याध्यापिका लता भोयर, सहाय्यक शिक्षक शहारे, धांडे, अंगणवाडी सेविका उषा गाढवे, सुरेखा लांबट, सुजाता चवरे,, सहसंचालक प्रफुल कातोरे, प्रणय कातोरे, कुंदा चवरे, आर्थिक चवरे, उन्नती चवरे, व विद्यार्थ्यांची आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती.



**पाटोदा/शिरूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती किरण शिंदे पाटील यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना. आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, सचिव अँड.महेश बेदरे, पत्रकार अजिज शेख, पत्रकार विजय जाधव, पत्रकार शेख महेशर ताहेर, प्रेस फोटोग्राफर सखाराम भोसले, पत्रकार सचिन गायकवाड, प्रेस फोटोग्राफर राहुल सोनवणे, पत्रकार रियाज सय्यद सह इतर**

**(छाया:- दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## बहुजन समाज पार्टी तर्फे टीईटी पेपर फुटी प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी -२०२६ होण्यापूर्वीच पेपर फुटी झाल्याचे उघडकीस आल्याने महाराष्ट्र राज्यातील लाखो प्रामाणिक गुणवंत व मेहनती विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे या गंभीर घटनेमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून राज्याच्या परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत झाला आहे. या प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली असली तरी संपूर्ण पेपर फुटी रॅकेटचा शोध घेऊन त्यामागील सर्व सूत्रधार संबंधित अधिकारी व इतर दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रभावी व पारदर्शक उपाययोजना करणे ही शासनाची जबाबदारी आहे. नीट परीक्षानंतर आता टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नावर पाणी फिरले आहे. महाराष्ट्र टीईटी पेपर फुटी प्रकरणाची विशेष तपास पथक एस आय टी यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफास करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी. विद्यार्थ्यांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक किंवा प्रशासकीय भार न टाकता परीक्षा पुन्हा सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी.




व या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी आपल्या मंत्रीपदाचा तात्काळ राजीनामा द्यावा. अशा आशयाच्या मागणीचे निवेदन बहुजन समाज पार्टी भंडारा विधानसभा तर्फे उपजिल्हाधिकारी लीना फलके भंडारा यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना देण्यात आले. भविष्यात अशा घटना घडू नयेत व परीक्षा ह्या निष्पक्ष व पारदर्शी व्हाव्यात यासाठी शासनाने कठोर उपाय योजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली. निवेदन देतेवेळी भंडारा गोंदिया लोकसभा प्रभारी संजय भिवगडे भंडारा विधानसभा अध्यक्ष नाशिक चवरे, रवींद्र गजभिये,, नेमीचंद बागडे, के.एल.गजभिये, जितेंद्र गजभिये, संजय गजभिये, रंजीत नंदागवळी, बाबुराव मेश्राम, सुनील डोंगरे, व बहुसंख्या ब. स. पा. कार्यकर्ते उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात करिअर संसद स्थापना व शपथविधी उत्साहात संपन्न




**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर तसेच करिअर कट्टा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर संसद स्थापना व शपथविधी कार्यक्रम सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता करिअर कट्टा अभ्यासिकेत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमात करिअर संसदेच्या नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, सामाजिक जबाबदारीची जाणीव तसेच करिअरविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे, करिअर कट्टा समन्वयक डॉ. मनोज कुमार चोपडे व डॉ. संतोष पडघन यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना जबाबदारीची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा विभागामार्फत यशस्वीरीत्या करण्यात आले.

## जिओ स्टुडिओजची मोठी घोषणा – नागराज मंजुळे दिग्दर्शित 'खाशाबा' चा दमदार टीझर आऊट, १ जानेवारी २०२७ रोजी जगभरात चित्रपट होणार प्रदर्शित!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : जिओ स्टुडिओज आणि आटपाट प्रॉडक्शन्स यांनी आज बहुप्रतिक्षित "खाशाबा" चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर रिलीज करत , १ जानेवारी २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याची अधिकृत माहिती दिली.

'धुरंधर', 'धुरंधर : द रिव्हेंज' आणि 'राजा शिवाजी' यासारखे सलग यशस्वी चित्रपट देत, भारतीय चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जिओ स्टुडिओजने आणखी एक महत्त्वाकांक्षी निर्मिती केली आहे. फॅन्ड्री आणि 'सैराट' सारख्या राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवलेल्या चित्रपटांनंतर दिग्दर्शक नागराज मंजुळे "खाशाबा" निमित्त पुन्हा एकदा एका भव्य आणि प्रेरणादायी कथेसह प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत.

चित्रपटगृहांमध्ये प्रथम प्रदर्शित झालेल्या खाशाबा च्या टिझरला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. आता तो डिजिटल प्लॅटफॉर्मसवर रिलीज करण्यात आला आहे. पारंपरिक कुस्तीच्या आखाड्याचे भव्य चित्रण, दमदार दृश्यरचना, उत्कंठावर्धक वातावरण, संघर्षाची भावनिक तीव्रता आणि चित्रपटाचा सिनेमॅटिक आवाका या टीझर मधून प्रभावीपणे अनुभवायला मिळतो.

नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या पार्श्वभूमीवर घडणारा हा चित्रपट महाराष्ट्रातील संघर्षशील कुस्तीपटूची कहाणी सांगतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावत भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करणाऱ्या

खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित आहे. 'खाशाबा' हा चित्रपट स्वतंत्र भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे महाराष्ट्राचे सुपुत्र आणि दिग्गज कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावले आणि भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा इतिहास घडवला. भारतीय क्रीडाक्षेत्रातील हा अभिमानास्पद प्रवास मोठ्या पडद्यावर भव्य स्वरूपात साकारत हा चित्रपट प्रादेशिक सिनेमातील सर्वात मोठ्या क्रीडापटांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगून आहे.

संगीत क्षेत्रातील दिग्गज जोडी अजय-अतुल यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे. खाशाबा यांच्या भूमिकेसाठी एका नव्या चेहऱ्याची निवड करण्यात आली असून, त्याची घोषणा लवकरच करण्यात येईल. या नवोदित कलाकारासोबत त्याबरोबरच

### स्वतंत्र भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणाऱ्या खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित भव्य क्रीडापट

जितेंद्र जोशी, महेश मांजरेकर, गिरीश कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, संदेश कुलकर्णी, सुरेश विश्वकर्मा, वैभव मांगले, छाया कदम, आणि गार्गी कुलकर्णी यांसारख्या एकापेक्षा एक दमदार कलाकारांचा सहभाग आहे.

जिओ स्टुडिओज आणि आटपाट प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'खाशाबा' या चित्रपटाची निर्मिती ज्योती देशपांडे आणि गार्गी कुलकर्णी यांनी केली असून दिग्दर्शन नागराज मंजुळे यांचे आहे.'खाशाबा' १ जानेवारी २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यास सज्ज आहे.

# स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर दुष्परिणाम; शाळेच्या परिसरात 'एनर्जी ड्रिंक्स'ना बंदी
## फ्लेवर पानांच्या नावाखाली अंमली पदार्थ विक्रीचीही चौकशी होणार – मंत्री नरहरी झिरवाळ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / ज्योत्स्ना करवडे :** सोशल मिडिया आणि टिव्हीवर मोठ्या प्रमाणात जाहिरात करण्यात येणाऱ्या स्टिंग या एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनामुळे अहिल्या नगर, पाथर्डी, श्रीगोंदा, या भागात शाळकरी मुलांचा हृदयाचे ठोके वाढल्याने मृत्यू झाल्याच्या घटना उघडकीय आल्या आहेत. शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुणांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व अतिसेवनामुळे घातक ठरणाऱ्या 'एनर्जी ड्रिंक्स'च्या विक्रीवर शाळा कॉलेजच्या ५०० मीटर परिसरात विक्री करण्यास बंदी घालण्यात आल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत केली.




मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, राज्य सरकारने निर्बंध लागू केले आहेत. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिसरामध्ये या एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात 'फ्लेवर पानां'च्या नावाखाली होणारी अंमली पदार्थांची विक्री आणि फ्लेवर मिल्कच्या नावाखालील भेसळीची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, असे आश्वस्त करत मंत्र्यांनी यासाठी सध्या विशेष तपास मोहीम सुरू असल्याचे सभागृहात स्पष्ट केले.

विधानसभेत तारांकीत प्रश्नोत्तराच्या तासात भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी या संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला. सोशल मिडियावरील जाहिरात होत असलेल्या शाळकरी मुलांचा मुद्दा मांडताना पाचपुते यांनी सांगितले की,"अहिल्यानगरमधील श्रीगोंदा आणि पाथर्डी या विभागात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकच्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानी पोहोचवणारे कॅफिन, अतिप्रमाणातील साखर आणि 'कार्मोजिन' सारखे कृत्रिम रंग या पेयांमध्ये सर्रास वापरले जात आहेत. या ड्रिंकच्या बाटलीवर 'लहान मुलांसाठी हे पेय देऊ नये. असा इशारा असूनही शाळा-कॉलेजच्या कॅन्टीन व परिसरात त्याची दारूपेक्षाही घातक पद्धतीने विक्री होत आहे, असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर उत्तर देताना मंत्री झिरवाळ यांनी शाळेच्या आवारात ही पेये विकली जात असल्याची कबुली दिली आणि ५०० मीटरच्या आत अंमली पदार्थांसह सर्व प्रकारच्या एनर्जी ड्रिंक्सवर बंदी घालण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. याच मुद्द्याला पकडून आमदार राहुल कुल यांनी ऊर्जा देण्याच्या बहाण्याने शाळा परिसरात चालणाऱ्या इतर पेयांच्या विक्रीकडे लक्ष वेधले. "फ्लेवर पानांच्या नावाखाली शाळकरी मुलांना अंमली पदार्थ विकले जात आहेत. तसेच दुधाच्या भेसळीत फ्लेवर मिल्क म्हणून जास्त साखर आणि कृत्रिम द्रव्ये वापरून मुलांचे आरोग्य धोक्यात आणले जात आहे, याची सखोल चौकशी व्हावी," अशी मागणी कुल यांनी केली.

यावर उत्तरादाखल बोलताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, या गंभीर बाबींची दखल घेऊन वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या अंतर्गत सध्या विशेष तपासणी व कारवाईची मोहीम सुरू आहे. असे सांगितले.

**कॅफिनच्या मिश्रणाचे नियम काय?**

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या नियमांचा हवाला देत मंत्र्यांनी लिखित उत्तरात स्पष्ट केले की, अशा कॅफिनेटेड पेयांमध्ये कॅफिनचे प्रमाण प्रति लिटर १४५ मिग्रॅ ते ३०० मिग्रॅच्या मर्यादेत असणे बंधनकारक आहे.

राज्यात एप्रिल २०२५ ते मे २०२६ दरम्यान घेतलेल्या विविध एनर्जी ड्रिंक्सच्या ११५ नमुन्यांपैकी काही नमुने कमी दर्जाचे आणि 'मिथ्याछाप' (मीसब्रँडेड) आढळले असून दोषींवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

शाळा आणि कॉलेजच्या कॅम्पस परिसरात यापुढे कोणत्याही आक्षेपार्ह जाहिराती व विक्री खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# एस आय आर साठी माहूर एमआयएमची जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी/ सय्यद इसा :** माहूर शहर व तालुका ए आय एम आय एम पक्षाकडून शासनाच्या निर्देशानुसार एस आय आर मॅपिंग करण्यासाठी नागरिकांना अडचणी येऊ नये म्हणून शहरातील 15 ,16 , व 9 वार्डाच्या मध्यभागी कॅम्प उभारण्यात आला असून रात्री दहा वाजेपर्यंत एम आय एम चे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मॅपिंग बद्दल काही अडचणी असल्यास त्या सोडवत असून बीएलओंना बसण्यासाठी जागा पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले असून या कॅम्पला मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी भेट देऊन एस आर मॅपिंग बाबत जनजागृती केली.

ए आय एम आय एम चे माहूर तालुका अध्यक्ष सज्जाद भाई आणि सामाजिक कार्यकर्ते आणि भावी नगराध्यक्ष इरशाद भैय्या मकरानी यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने लागू केलेल्या एस आय आर मॅपिंग संदर्भात जनजागृती करण्यात आली असून वॉर्ड क्रमांक 15, 16 व 9 या तिन्ही वॉर्डांत डोअर टु डोअर जाऊन जनजागृती करण्यासाठी आली

**•शहरातील तीन प्रभागासाठी तयार केला कॅम्प**
**•बी एल ओ शहरातील नागरिकांसाठी आसन व्यवस्था पिण्याचे पाणी**



पुढील वर्गात राहणारे वृद्ध नागरिक व इतर नागरिकांना एसआर मॅपिंग साठी अडचणी येऊ नये म्हणून ए आय एम आय एम चे माहूर तालुका अध्यक्ष सज्जाद शेख सामाजिक कार्यकर्ते तथा भावी नगराध्यक्ष इरशाद भैय्या मकरानी, जिलानी भाई, पेंटर जावेद, मुजीब सर, शहजाद नवाब ,फैजुल्ला खान, बबलू टेलर ,अजीस शेख ,सलमान लाला, सुलतान लाला ,अर्शद खान , शाहीद लाला, शोएब उर्फ शेरालाइक ,सौदागर तौफिक ,भगवानअभिषेक कांबळे, विठ्ठल राठोड ,ताहीर शाह ,आसिफ बेग यांचे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

# पेपरफुटी आणि ऑनलाईन परीक्षेविरोधात पुसदमध्ये विद्यार्थ्यांचा एल्गार; छात्र भारतीचा भव्य निषेध मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नीट (NEET) व टीईटी (TET) परीक्षांमधील कथित पेपरफुटी तसेच एमपीएससीची (MPSC) पूर्व परीक्षा ऑनलाईन घेण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात आज पुसद शहरात विद्यार्थ्यांचा प्रचंड असंतोष पाहायला मिळाला. 'छात्र भारती' विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली आज शेकडो विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निषेध मोर्चा काढला.

बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसीलदार कार्यालय; विद्यार्थ्यांची निदर्शने

स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून या भव्य मोर्चाची सुरुवात झाली. हातात निषेधाचे फलक आणि सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करत शेकडो विद्यार्थी या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. "पेपरफुटी करणाऱ्यांवर कडक कारवाई करा", "विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ थांबवा", आणि "एमपीएससी परीक्षा ऑफलाईनच झाली पाहिजे", अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. हा मोर्चा शहराच्या मुख्य मार्गावरून फिरत शेवटी तहसीलदार कार्यालयावर धडकला.

**विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या:**



तहसीलदार कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले, जिथे छात्र भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि संतप्त विद्यार्थ्यांनी प्रशासनावर कडक शब्दांत टीका केली. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्यातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

NEET आणि TET पेपरफुटीची सखोल चौकशी: लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लावणाऱ्या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधारांना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा व्हावी.

MPSC ऑनलाईन परीक्षेला विरोध: एमपीएससीची पूर्व परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय रद्द करून ती नेहमीप्रमाणे पारदर्शक पद्धतीने ऑफलाईनच घेण्यात यावी.

विद्यार्थ्यांना न्याय द्या: वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे जे नुकसान होत आहे, त्यांना सरकारने मानसिक व आर्थिक दिलासा द्यावा.

आंदोलनाच्या शेवटी, विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे निवेदन पुसदच्या तहसीलदारांना सुपूर्द करण्यात आले. हे निवेदन तात्काळ राज्य सरकार आणि संबंधित परीक्षा मंडळांकडे पाठवून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. तसेच, या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास संपूर्ण राज्यभरात याहून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा

**"रात्रंदिवस अभ्यास करूनही जर परीक्षांचे पेपर फुटत असतील आणि ऑनलाईनच्या नावाखाली गोंधळ घातला जाणार असेल, तर विद्यार्थ्यांनी न्याय मागायचा कुठे? सरकारने विद्यार्थ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये."**
**— प्रशांत खंदारे, (राज्य सचिव छात्र भारती )**

इशाराही छात्र भारती आणि आंदोलक विद्यार्थ्यांनी यावेळी दिला.

या मोर्चात छात्र भारतीचे राज्य अध्यक्ष अनिकेत घुले, संघटक विशाल शिंदे सचिव प्रशांत खंदारे जिल्हाध्यक्ष भूषण ढोले, शुद्धोधन कांबळे, अस्मित, ठेंगे देवानंद दांडेगावकर, दत्ता वंजारे, कुणाल वाघमारे विजय कबले, शुभम ढाकरे, अजय लोखंडे, यश मोटे, प्रशांत कांबळे,हृतिक पाईकराव, श्रीकांत पुंड, विनय ढोले, शेख. इसराईल, अश्विनी शेवाळे, सावली खंदारे, आचल कांबळे, नेहा घोडेकर, ईश्वरी पवार, भुमिका राठोड,पुसद मधील प्रसिद्ध एल. सी. अकॅडेमी चे संचालक गोपाल जाधव सर व दत्तसेवा अकॅडेमी चे संचालक निरंजन राठोड व त्यांचे सर्व विद्यार्थ्यांनी या मोर्चासाठी उपस्थित होते

# पाऊले चालती पंढरीची वाट ! वारकऱ्यांच्या पायी दिंड्या पंढरपूरच्या वाटेवरी

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा :** "पाऊले चालती पंढरीची वाट! या अभंगातून भाविक भक्तांचा परमार्थिक भाव व पंढरीच्या (पंढरपूर) पांडुरंगाच्या भेटीसाठी लागलेली ओढ भक्ती रसाने तृप्त करणारी आहे.महाराष्ट्राची भुमी साधु संतांच्या आध्यात्मिक विचारांनी प्रेरित झालेली आहे. त्यांच्या भक्ती व आध्यात्मिक धार्मिक पारंपरिक वारस्यातुन आजही मोठ्या प्रमाणावर ग्रामीण व शहरी भागातील वारकरी एकत्रित येवुन आषाढी एकादशीला पंढरपूरला दिंड्या घेऊन समुहाने पायी चालत जातात. भाविक भक्त वारकऱ्यांची दिंडी म्हणजे पंढरीच्या वारीत (तीर्थयात्रेत) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर एकत्र चालणारा वारकऱ्यांचा शिस्तबद्ध आणि संघटित समूह होय। वारी हा वैयक्तिक प्रवास नसून ही एक सामूहिक उपासना आहे, ज्यामध्ये अनेक दिंड्या एकत्र मिळून चालतात।

दिंडीची रचना आणि परंपरेची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

दिंडीची रचना (क्रम)

दिंडीतील झेंडेकरी:- दिंडीच्या सर्वात पुढे भगव्या पताका (झेंडे) घेतलेले वारकरी असतात, जे दिंडीचे नेतृत्व करतात किंवा सीमा दर्शवतात। दिंडीत पादुका व मानांचा अश्व (घोडा)पुढे असतो.

दिंडीतील टाळकरी:- झेंडा घेतलेल्या वारकऱ्यांमागे टाळ वाजवणारे आणि भजन गाणारे त्यांच्या बरोबरीने तल्लीन होऊन पावले टाकणारे वारकरी असतात।

दिंडीतील वीणेकरी व पखवाजी: दिंडीच्या मध्यभागी वीणा आणि पखवाज वाजवणारे असतात. विणेकरी संपूर्ण दिंडीचे संचलन करतात।



दिंडीतील महिला वारकरी:- यांच्या मागे डोक्यावर तुळशी वृंदावन आणि हातामध्ये पाण्याचे हांडे घेतलेल्या महिला शिस्तीत चालतात।अन्य महिला टाळ व हाताची टाळी वाजवत दिंडीत सहभागी होतात.

दिंडीचे महत्त्व व शिस्त दिंडीतील सामूहिकता:- एका दिंडीमध्ये एकच वीणा असतो आणि संपूर्ण दिंडीत मिळून एकच भजन किंवा हरिपाठ चालतो। सर्वांनी सामुदायिक सहभाग घेणे व भक्ती भावाने दिंडीतील एकात्मता टिकवणे हा दंडक पाळला जातो.

दिंडीतील आचारसंहिता:- दिंडीत चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला काही कठोर नियमांचे पालन करावे लागते. यामध्ये सात्विक शाकाहारी आहार, मादक पदार्थांचे सेवन पूर्णपणे वर्ज्य असते।असभ्य वर्तन दिंडीत करता येत नाहीएकमेकांशी प्रेमाने सलोख्याने वागावे हा नियम असतो.

दिंडीतील समता:- या दिंडीत जात, पात, धर्म किंवा आर्थिक स्थितीचा भेद न करता सर्वजण 'माऊली' किंवा 'विठ्ठल' नामाचा गजर करत समानतेने सर्वांच्या सोबत आनंदाने चालतात।

**दैनंदिन दिनचर्या...**

वारी दरम्यान वारकरी दररोज सरासरी २०ते२५ कि.मी.मुक्कामी ठिकाणा पर्यंत पायी चालतात।

मुक्कामाच्या ठिकाणी पोहचल्यावर सर्व दिंड्या आपापल्या जागी विसावतात. तिथे हरिपाठ, कीर्तन आणि प्रवचन व मुक्काम ठिकाणी हरि किर्तनाचे आयोजित केले जाते।

वारकरी परंपरेत दिंड्यांचे क्रमांक ठरलेले असतात आणि आषाढी तसेच कार्तिकी वारीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सोहळ्यात शेकडो मानाच्या व इतर दिंड्या वारकरी शिस्तीत सहभागी होतात। देहू येथून संत तुकाराम महाराज यांची दिंडी, आळंदीतुन संत ज्ञानेश्वर महाराज यांची दिंडी, शेगावची संत गजानन महाराज यांची दिंडी, पैठण येथुन संत एकनाथ महाराज यांची दिंडी, संत मुक्ताबाईची दिंडी,संत निवृत्तीनाथांची दिंडी, संत सोपानकाकाची दिंडी,या सारख्या अनेक मानाच्या दिंड्या



महाराष्ट्रातुन आषाढी एकादशीच्या वारीला पायी भक्तिभावाने पंढरपूरला जातात.बीड जिल्हा संत महंताचा जिल्हा म्हणून नावलौकिक आहे बीड जिल्हा तुन.श्रीक्षेत्र नारायण गडाची दिंडी, श्रीक्षेत्र भगवान गडावरून संत भगवानबाबांनी सुरू केलेली दिंडी,श्रीक्षेत्र गहिनिनाथ गडा वरून वैराग्य मुर्ती संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली दिंडी,वै बंकटस्वामी महाराज यांनी सुरू केलेली दिंडी या सारख्या असंख्य दिंड्या पंढरपूरला लाखों भाविकांना भक्तिभावाने घेऊन जातात. या भाविक भक्तांच्या वारकऱ्यांच्या दिंड्या पायी चालत अखंड विठ्ठलाच्या नामाचा जप करत ऊन वारा, पाऊस,यांचा विचार न करता. रात्र दिवस पांडुरंगाच्या भेटीसाठी अधिर होवून दिंडीत सहभागी होतात. भक्ति रसात तृप्त होतात.

**लेखक**
**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
**संचालक -महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ.**
**इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बीड.**
**मो.नं.- ९४२००१९५९७**

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शिरपूर जैनच्या नव्याने रुजू झालेल्या दबंग ठाणेदार योगिता भारद्वाज यांचा सत्कार !

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** शिरपूर जैन पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेल्या प्रभारी पोलीस निरीक्षक (ठाणेदार) श्रीमती योगिता भारद्वाज यांचा निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा दैनिक युवक आधार वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे तसेच दैनिक समतापथ रिसोड–मालेगाव तालुका प्रतिनिधी गोपाल बोरकर पाटील उपस्थित होते.

सत्कारानंतर जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांनी ठाणेदार योगिता भारद्वाज यांच्याशी शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. परिसरातील कायदा व सुव्यवस्था, अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई, गुन्हेगारीला आळा, सर्वसामान्य नागरिकांना न्याय, पोलीस–पत्रकार समन्वय तसेच नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा यासह विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी ठाणेदार योगिता भारद्वाज यांनी पोलीस प्रशासन हे जनतेच्या सेवेसाठी असून नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी भूमिका स्पष्ट केली. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध







**"शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे हेच आमचे प्रथम कर्तव्य आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा तात्काळ निपटारा करून त्यांना योग्य व निष्पक्ष न्याय दिला जाईल. तसेच अवैध धंदे, गुन्हेगारी आणि बेकायदेशीर कृत्यांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल."**
**— श्रीमती योगिता भारद्वाज**
**प्रभारी पोलीस निरीक्षक (ठाणेदार), शिरपूर जैन**

कोणतीही तडजोड केली जाणार नसून, अवैध धंदे, गुन्हेगारी आणि समाजविघातक कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच पोलीस व पत्रकार यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्यास समाजातील अनेक प्रश्न प्रभावीपणे मार्गी लागू शकतात, असे मतही त्यांनी व्यक्त केले. लोकहिताच्या प्रत्येक कार्यात पोलीस प्रशासनाकडून सकारात्मक सहकार्य राहील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

करण धोंगडे यांनीही लोकहिताच्या विषयांवर निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ सातत्याने आवाज उठवत असून, समाजहिताच्या प्रत्येक उपक्रमात पोलीस प्रशासनाला सकारात्मक सहकार्य राहील, अशी भूमिका व्यक्त केली.